यंदा सरासरीपेक्षा कमी पाऊस

गोदड महाराज यांच्या संवत्सरीमधील भाकीत

कर्जत (प्रतिनिधी)– यावर्षी सरासरीपेक्षा कमी पाऊस, वादळे, भूकंप व आगीच्या मोठ्या घटना घडणार असल्याचे भाकीत कर्जतच्या संत सद्गुरू गोदड महाराज यांच्या हस्तलिखितामध्ये वर्तविण्यात आले आहे.

जिल्ह्यातील कर्जत येथील संत सद्गुरु गोदड महाराज यांनी संजीवन समाधी घेतली आहे. मात्र, तत्पूर्वी त्यांनी अनेक ग्रंथसंहितासह विविध प्रकारचे लिखाण केलेले आहे. प्रत्येक वर्षी गुढीपाडव्याच्या दिवशी यावर्षीचे भाकीत किंवा भविष्य वाचण्याची शेकडो वर्षांची परंपरा आहे. साठ वर्षापूर्वीच्या या संवत्सरी त्यांनी देश व जागतिक पातळीवरील घटनांबाबत लिहून ठेवलेल्या आहत. त्यांच्या या लिखानाला 'श्री सद्गुरु गोदड महाराज फळ' असे देखील म्हणण्यात. शालिवाहन शके १९४७ यावेळी याची लिखाण महाराजानी केले आहे. प्रत्येक वर्षीच भाकीत हे चैत्र पाडव्याच्या दिवशी वाचण्यात येते. यावेळी मोठ्या संख्येने भावी उपस्थित असतात. यावर्षी पाऊस कसा असेल, कोणती पिके चांगली राहतील, नैसर्गिक संकटे येतील का, राजकीय घडामोडी काय असले, या सर्व बाबींचा उल्लेख यामध्ये आढळून येतो.

दरवर्षी प्रथेप्रमाणे मानकरी यांना वाजत गाजत कर्जत मंदिरामध्ये आणण्यात येते. त्यानंतर संत गोदड महाराज यांच्या नावाचा गजर करून मंदिराचे पुजारी हभप पंढरी महाराज काकडे व हभप अनिल महाराज काकडे हे या संवत्सरीचे यावर्षीचे भाकीत काय आहे याचे वाचन करतात. यंदाच्या आगामी भाकितामध्ये म्हटले की, यावर्षीच्या संवत्सरीचे नाव विश्वा वसूनाम संवत्सर असे आहे. याचा स्वामी रवी आहे. यावर्षी मोठमोठी वादळे होतील, जोरदार वारा सुटेल, सरासरी पाऊस कमी पडेल, प्रचंड उष्णता यामुळे आगीच्या घटना देखील घडतील, भूकंप होतील, तर देशातील काही भागांमध्ये गारपीट होईल.

पाऊस सर्वत्र सारखा पडणार नसल्यामुळे ज्या भागांमध्ये कमी पाऊस होईल, त्या ठिकाणी अन्न धान्याची टचाई निर्माण होईल. यामुळे अन्नधान्याचा संचय करावा, असे भाकीत सांगण्यात आले आहे. खरीप पिकानंतर रब्बी पिकाला देखील यावर्षी कमी पावसामुळे अडचण निर्माण होईल. यावर्षी मागील वर्षाच्या तुलनेत आणखी उष्णता वाढेल. या उष्णतेची तीव्रता एवढी असेल की अनेक ठिकाणी आगी लागण्याच्या घटना घडतील. चारा जनावरांना कमी होईल. यामुळे नुकसान होण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. असे असताना काही भागांमध्ये मात्र मोठ्या प्रमाणामध्ये गारपिटी, वादळी वाऱ्यासह जोरदार पाऊस पडून त्याची देखील संकट निर्माण होईल. आषाढ, श्रावण महिन्यामध्ये कमी पाऊस पडणार आहे. अश्विन, कार्तिक मार्गशीष महिन्यांमध्ये वातावरण अनिश्चित असेल. पाऊसही सर्वत्र सारखा न पडता कमी जास्त पाऊस ठीक ठिकाणी होईल. अशा पद्धतीची भाकित यावर्षीच्या गोदड महाराज संवत्सरीमध्ये व्यक्त करण्यात आले आहे.

दुर्गापूरला उद्यापासून आनदबाबा व काशाई यात्रा

राहाता (प्रतिनिधी)– राहाता तालुक्यातील दुर्गापूरचे ग्रामदैवत आनंदबाबा आणि काशाईचा यात्रा उत्सव उद्या मंगळवारपासून प्रारंभ होत आहे.

दोन दिवसीय यात्रा उत्सवामध्ये विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. ग्रामदैवत आनंद बाबा हे नवसाला पावणारे देवस्थान असल्याने जिल्ह्यासह राज्यभरातून भाविक या यात्रेमध्ये सहभागी होतात. यात्रेनिमित्त मंदिर परिसरामध्ये विद्युत रोषणाई करण्यात आली आहे. मंगळवारी सायंकाळी काठीची मिरवणूक, शोभेच्या दारूची आताषबाजी, मनोरंजनासाठी चंद्रकांत ढवळपुरीकर यांचे सुपूत्र किरणकुमार ढवळपूरीकर यांचा मोफत तमाशा याचबरोबर बुधवारी नामवंत कलावंतांच्या हजेऱ्या, कुस्त्यांचा हगामा आदी कार्यक्रम होणार आहे. भाविकांनी या यात्रेमध्ये सहभागी व्हावे, असे आवाहन यात्रा कमिटीच्यावतीने करण्यात आले आहे.

सोन्याला सुवर्णझळाळी

प्रतीतोळा ९२ हजार रुपये दर; पाडव्याच्या मुहूर्तावर सुवर्णबाजारात मोजकीच खरेदी

अहिल्यानगर (प्रतिनिधी)– गेल्या दोन ते तीन वर्षात सोनेजवळपास दीड ते दोन पट महागले आहे. यंदाच्या गुढीपाडव्या मुहूर्तावर नगरच्या बाजारपेठेत सोन्याने उच्चांकी ९२ हजार रुपये प्रती तोळ्याचा दर गाठला. रविवारी पाडवा सण असतांना नगरच्या सुवर्ण बाजारपेठे ग्राहकांनी मोजकीच खरेदी केली. यामुळे सराफ व्यवसायिकांना अपेक्षीत व्यवसाय करता आली नाही, असा दावा सुवर्णकार संघटनेच्यावतीने करण्यात आला. तर सुवर्ण बाजारपेठेऐवजी ग्राहकांनी अन्य खरेदीला पंसती दिल्याचे चित्र नगरमध्ये होते.

हिंदू नववर्षाचा पहिला दिवस म्हणजेच गुढीपाडवा उत्साहात पार पडला. यावेळी घरोघरी नागरिकांनी आनंदाची गुढी उभारून हिंदू नववर्षाचे स्वागत केले. यंदा चैत्रारंभापूर्वीच महागाईचा पारा तापला असला तरी मुहूर्ताची खरेदी म्हणून ग्राहकांचे घर, वाहन, गॅझेट्स वा विद्युत उपकरणे तसेच सोने-चांदीसारख्या मैल्यवान धातूबाबतचे आकर्षण यंदाही होते. मात्र, त्याला वाढलेल्या दराची व महागाईची किनार होती. गेल्या काही महिन्यांपासून अर्थव्यवस्थेत आलेली मरगळ झटकून खरेदीच्या माध्यमातून वसंत ऋतूच्या आगमनाला ग्राहकवर्ग सज्ज असल्याचे काल दिसून आले. यावेळी वाढत्या खरेदीमुळे विक्रेत्यांमध्येही आनंदाचे वातावरण होते. यावेळी अनेकजण नवीन वाहन खरेदी केली. यामुळे कार शोरूम, दुचाकी विक्री केंद्रांवर ग्राहकांची गर्दी होती. कंपन्यांनी विविध प्रकारच्या सूट योजना जाहीर केल्या, यात फ्री इन्शुरन्स, एक्स्चेंज बोनस आणि झिरो डाऊन पेमेंटसारख्या लाभामुळे खरेदीत वाढ होत असल्याचे विक्रेत्यांचे म्हणणे आहे. मोबाइल, लॅपटॉपप्रेमी ग्राहकांसाठी गुढीपाडवा हा नवीन स्मार्टफोन, लॅपटॉप, इयर इक्विपमेंट, स्मार्ट टीव्ही, अन्य इलेक्ट्रॉनिक उपकरणे खरेदी करण्याचा उत्तम दिवस मानला जातो. उन्हाचा हंगाम पाहता एसी, फ्रीजसाठीही ग्राहकांकडून चाचपणी सुरू होती. अनेकांनी मुहुर्तावर विविध खरेदी केली. मात्र, यंदा सोने-चांदीच्या बाजारपेठेला दरवाढीचा मोठा फटका असल्याचा दावा सराफ संघटनेकडून करण्यात आला. गेल्या दोन ते तीन वर्षापूर्वी ५० ते ५५ हजार तोळा असणारे सोने खरेदीसाठी आता ९२ हजार रुपये मोजावे लागत असल्याने ग्राहकांनी आवश्यकते पेक्षा अधिक खरेदीवर मुरड घातल्याचे दिसून आले. यामुळे यंदा पाडव्याच्या मुर्हुजावर नगरच्या बाजारपेठेत अपेक्षीत उलाढाल होवू शकली नाही. नगरमध्ये काल मुहूर्तावर २४ कॅरेट सोन्याचे दर हे ९२ हजार होते. तर २२ कॉरेट सोने हे ९० हजार रुपये प्रती तोळा होते. यामुळे ग्राहकांनी सोने-चांदीऐवजी अन्य खरेदीला प्राधान्य दिल्याचे दिसून आले.

सोने लवकरच लाखाच्या घरात

- गेल्या काही वर्षात जागतिक पातळीवर सुरू असणाऱ्या घटना घडामोडीचा परिणाम सोन्याच्या दरावर झालेला आहे. यामुळे काही वर्षात सोनेच दर हे दुप्पट वाढले आहेत. येत्या काही महिन्यांत सोने हे लाखाच्या घरात जाणार आहे. एक तोळ्यासाठी एक लाखांच्या जवळपास एक लाखाची किंमत मोजावी लागणार आहे. वाढत्या दरामुळे ग्राहक आवश्यक तेवढेच अथवा बजेटमध्ये बसले तेवढचे सोने खरीद करत आहेत.

–संतोष वर्षा, जिल्हाध्यक्ष सुवर्णाकार संघटना, नगर

...तर फडणवीस यांना आमचा पाठिंबा- राज ठाकरे

मुंबई– होळी संपलेली आहे. तुमच्या साक्षीने सांगतो, देवेंद्र फडणवीस तुमच्या हातामध्ये एक चांगलं, सुसंस्कृत राज्य आलेलं आहे, याच्याकडे नीट बघा. मराठी माणसाला चांगल्या पद्धतीने पाहणार असेल तर आमचा पाठिंबा निश्चित राहील. प्रत्येक गोष्टीत पाठिंबा राहील. पण प्रत्येक गोष्ट आमची ऐकून करा, अशी भूमिका राज ठाकरे यांनी मांडली. हा महाराष्ट्र आसुसलेला आहे. आता उन्हाळा आहे. आता पाण्याचे प्रश्न सुरु होतील. शेतकरी आत्महत्येचे प्रश्न आहेत. कंपन्या लिटून जात आहेत, असंही राज ठाकरे म्हणाले.

तुम्ही सगळे जातीपातीचे भेद बाजूला सारुन एकत्र आलं पाहिजे. तामिळनाडू बघा. तामिळनाडूत हिंदी आणत आहेत. पण तिथल्या लोकांनी नाही सांगितलं. हिंदू येऊ देणार नाही. केरळमध्ये येऊ देणार नाही. आम्हीच लोटांगण घालतोय. आम्हालाच समजत नाही, आम्ही काय करायचं. मी इतका भांबावलेला मराठी माणूस आजपर्यंत बघितलेला नाही. मी इतका राजकारणात झालेला चिखल देखील आजपर्यंत पाहिलेला नाही. कोणत्याच गोष्टींचं आम्हाला गांभीर्य उरलेलं नाही. सगळेजण त्या इन्स्टाग्रामवर चालू आहेत. कारण डान्सबार बंद झाले. तिकडे जे हे चालायचं ते मोबाईलवर आले. कशात गुंतून पडले आहात हे एकदा विचार करा, असं राज ठाकरे म्हणाले.

औरंगजेबाच्या कबरीची सजावट काढून टाका आणि त्याला मराठ्यांनी गाडलंय हा फलक लावा

- औरंगजेबाने संभाजी राजांना क्रूर पद्धतीने मारलं. औरंगजेबाशी राजाराम महाराज, ताराराणी , संताजी आणि धनाजी यांनीही लढा दिला. औरंगजेबाला शिवाजी नावाचा विचार मारायचा होता पण तो त्याला जमला नाही. जगाच्या इतिहासात औरंगजेब वाचला जातो, त्याचा अभ्यास केला जातो. त्याचा अभ्यास केला जातो तेव्हा लोकांना कळतं छत्रपती शिवाजी महाराजांचं शौर्य. जी कबर आहे ना तिथली सजावट काढून टाका आणि तिथे मोठा फलक लावा, मराठ्यांना म्हणजे आम्हाला हरवायला आलेला औरंगजेब हा इथे गाडला गेला. अफझल खान प्रतापगडावर आला होता. त्याला पायथ्याशीच पुरला. पुरुन उरेन हा शब्द करुनच तिथूनच आला. त्याची कबर महाराजांना विचारल्याशिवाय बांधली गेली? शक्यच नाही. ज्यांना गाडलंय त्यांची प्रतीकं नेस्तनाबूत करुन चालणार नाही. जगाला दाखवलं पाहिजे आम्ही यांना गाडलं आहे. असंही राज ठाकरे म्हणाले.

संतोष देशमुख प्रकरणात पसरवलं काय गेलं? वंजाऱ्याने मराठ्याला मारलं

- रोजगाराचे विषय, कामगारांचे विषय, शेतकऱ्यांचे विषय हे सगळे विषय बाजूला टाकत आहोत. संतोष देशमुख यांना किती घाणेरड्या पद्धतीने मारलं. तुमच्या नसानसांत इतकी क्रूरता असेल तर मी दाखवेन जागा. हे सगळं झालं कशातून विंड मिल, तिथली राख. मी आजवर ऐकलं होतं राखेतून फिनिक्स भरारी घेतो. बीडमध्ये राखेतून गुंड तयार होतो. संतोष देशमुखांनी या सगळ्याला विरोध केला. कारण विषय होता खंडणीचा. खंडणींचा विरोध करणाऱ्यांचा. आम्ही लेबलं काय लावली? वंजाऱ्याने मराठ्याला मारलं. यात जातींचा काय संबंध? राजकीय पक्ष तुम्हाला सातत्याने जातीपातीत गुंतवत आहेत. शेतकऱ्यांच्या दिवसाला सात आत्महत्या होत आहेत, रोजगार निर्मिती होत नाहीत, मराठवाडा सोडून तरुण-तरुणी पुण्यात येतात. या सगळ्याकडे दुर्लक्ष व्हावं म्हणून हे सगळं चाललं आहे असाही आरोप राज ठाकरेंनी केला आहे.

पान १ वरुन

यंदा भरपूर पाऊस...

रात्रभर ही नक्षत्र रुपी खड्डे झाकून ठेवली जातात. दुसऱ्या दिवशी बाल भैरवनाथ व माता जोगेश्वरीची विधिवत पूजा केली जाते. त्यानंतर चालू वर्षात पर्जन्यमान कसे होईल हे सांगण्यात येते. नक्षत्र रुपी खड्ड्यामध्ये वडाच्या पानांमध्ये जर जास्त पाणी शिल्लक राहिले तर त्या नक्षत्रात चांगला पाऊस, ज्या नक्षत्ररुपी खड्ड्यात मध्यम पाणी शिल्लक राहील त्या नक्षत्रात मध्यम पाऊस तर ज्या नक्षत्र रुपी खड्ड्यात पाणीच शिल्लक राहणार नाही ते नक्षत्र कोरडे जाणार असल्याचे होईक सांगितले जाते. जयद्रथ होन व त्यांच्या सहकाऱ्यांनी शनिवारी रात्री या खड्ड्यांची पूर्वतयारी करून ठेवली होती.

पुरोहित उमेश जोशी गुरु यांच्या हस्ते नक्षत्र रुपी खड्ड्यांची पूजा झाल्यानंतर १८ नक्षत्रा मधील पावसाचा अंदाज वर्तवण्यात आला. पर्जन्यमान वर्तवल्यानंतर चालू वर्ष कसे जाणार असल्याचे पंचांग वाचन करून सांगितले. यावेळी यात्रेचे नियोजन करण्यात आले. तेलवण शनिवार ५ एप्रिल रोजी पडणार आहे. रविवारी रामनवमीपासून पाच दिवसाचे उपवास सुरू राहणार आहे. बाल भैरवनाथ व जोगेश्वरीचा रथ उत्सव १० एप्रिल रोजी असणार आहे. जत्रा व कुस्त्यांचा हगामा ११ एप्रिल रोजी होईल. हनुमान जयंती १२ एप्रिलला असून भैरवनाथ यात्रा उत्सव जवळपास पंधरा दिवस चालणार आहे. बाल भैरवनाथ यात्रा उत्सव व दर्शनाचा पंचक्रोशीतील भाविकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन भैरवनाथ ट्रस्ट चांदेकसारे, यात्रा उत्सव कमिटी व चांदेकसारे ग्रामस्थांनी केले आहे.

वैजापुरच्या स्मशानातील गुढीचा कौल

वतीने दरवर्षी पाडव्याच्या एक दिवस अगोदर येथील स्मशान भूमीत हा सण साजरा केला जातो. वैजापूरच्या गुढीला विशेष महत्व आहे. या गुढी वरून येणाऱ्या वर्षातील पीक पाणी, बाजारातील तेजी-मंदी, धन-धान्य स्थिती, देशातील नागरीकांचे आरोग्य या बाबतचे आराखडे या गुढीच्या माध्यमातून बांधले जातात. गुढी पाडव्याच्या आदल्या दिवशी अमावस्याच्या दिवशी स्मशान भूमीत ज्या ठिकाणी पार्थिवावर अंतिम संस्कार केलेले असतात ती जागा स्वच्छ केली जाते,त्यावर पाणी शिंपडले जाते. त्या जागेवर मडके ठेऊन, श्रीफळ आदी गुढीचे प्रतीक म्हणून ठेवले जाते,त्याच्या दक्षिण बाजूस बारा मराठी महिन्याचे बारा खड्डे ,तसेच पूर्व,पश्चिम,उत्तर दक्षिण,तसेच राजभग प्रजाभाग असे एकूण १८खड्डे केले जातात,या प्रत्येकात २१व२१ ज्वारीचे दाणे टाकून त्यावर रुई ची पाने ठेवली जातात.यावर्षी साळुंके परिवारातील दीपक सोपानराव साळुंके याच्या द्वारे पूजा करण्यात आली.पाडव्याच्या दिनी म्हणजे या वर्षी रविवार(ता,३०)रोजी भल्या पहाटे गुढीला पंचधान्य नैवैद्य दाखविण्यात आला व कावळा नैवैद्याला स्पर्श करण्याची वाट पाहण्यात आली,यावर्षी कावळा आलाच नाही,म्हणून सव्वा सात वाजता प्रत्येक खड्यावर ठेवलेले रुईचे पान काढून खड्यातील दाणी मोजण्यात आली. ज्या खड्यात दाणे कमी त्या महिन्यात मंदी असा तर्क काढला जातो,व ज्या महिन्याच्या खड्यात दाणे वाढले त्या महिन्यात तेजी असे आराखडे बांधल्या जातात. यावर्षी श्रावण महिन्यातिल खड्ड्यात कमी दाणे दिसून आले त्या मुळे या महिन्यात मंदी असेल असा तर्क काढण्यात आला.इतर खड्यात एक-किंवा दोन दाणे कमी-जास्त आढळून आले ,त्यामुळे इतर महिन्यात फार कमी प्रमाणात तेजी-मंदी असेल असे तर्क लावण्यात आले.हे तर्क व भाकीत ऐकण्यासाठी पाटील गल्लीतील मारोती मंदिरात शहर व परिसरातील नागरिकांनी मोठी गर्दी केली होती. या प्रसंगी मानकरी दीपक सोपानराव साळुंके यांच्या व्यतिरिक्त मधुकर साळुंके,शिवाजी साळुंके,अरविंद साळुंके,सामाजिक कार्यकर्ते व या प्रक्रियेची माहिती नव्या पिढीला विशद करणारे जेष्ठ नागरिक ठा,धोंडीरामसिंग राजपूत, तसेच रामकृष्ण पुतळे, सजनराव गायकवाड,शंकरराव साळुंके, निखाडे पाटील,रामनाथ गावडे,संदीप व अरुण साळुंके,भगवान साळुंके,गंगाधर साळुंके, भाऊसाहेब साळुंके, राजेंद्र साळुंके, यांच्या सह असंख्य नागरिक उपस्थित होते.

पावसाळा समाधानकारक नसेल

सोडवायचा आहे. खासदार साहेबांचे स्वप्न साकार करायचे आहे. घाटमाथ्यावरून पश्चिमेकडे वाहून जाणारे पाणी गोदावरी खोऱ्यात आणण्यासाठी सर्व्हेचे काम सुरू केले आहे. त्यासाठी ६४ कोटी रुपये उपलब्ध करून दिले आहेत. कालवे, चाऱ्या यांच्या दुरुस्तीचे काम सुरू आहे. रस्ते, पिण्याच्या पाण्याच्या योजना यांची कामे गतीने सुरू आहेत. गावाच्या विकासासाठी जे करायचे आहे त्याचा आराखडा तयार करावा. नागरिकांना मूलभूत सुविधा उपलब्ध होण्यात अडचण येणार नाही याची काळजी ग्रामपंचायतीने घ्यावी असे सांगत त्यांनी ग्रामस्थांना नवीन वर्षाच्या शुभेच्छा दिल्या.

अण्णासाहेब म्हस्के पाटील म्हणाले, गावाचा एकोपा असेल तर गाव काय करू शकते याचा आदर्श लोणी बुद्रुक गावाने निर्माण केला आहे. शिक्षण, आरोग्य क्षेत्रात याठिकाणी झालेल्या विकासामुळे गावात बाहेरून येणारे विद्यार्थी, पालक आणि इतर नागरिक यांच्यासाठीही इथे सर्व सोयी-सुविधा उपलब्ध आहेत. व्यापार, व्यवसाय वाढल्याने अनेक व्यापारी संकुले उभी राहिली. त्यातूनही रोजगार उपलब्ध झाला आहे. गावातील विकासकामे दर्जेदार होण्यासाठी ग्रामस्थांनी लक्ष द्यावे असे सांगत त्यांनी उपस्थितांना गुढीपाडव्याच्या शुभेच्छा दिल्या. यासभेत डॉ.प्रतीक विखे व डॉ. दत्तप्रसाद विखे यांचा ना.विखे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. सरपंच कल्पना मैड, ट्रक सोसायटीचे अध्यक्ष नंदकिशोर राठी, प्रवरा बँकेचे संचालक किसनराव विखे, तंटामुक्तीचे अध्यक्ष संपतराव विखे, विकास सोसायटीचे अध्यक्ष अशोकराव धावणे, उपाध्यक्ष नाना म्हस्के, सी.एम.विखे, उपसरपंच गणेश विखे, एम वाय विखे, मधुकर विखे, कुंडलिक म्हस्के, विजयराव लगड, बाजार समितीचे संचालक राहुल धावणे, विक्रम विखे, अनिल विखे, ग्रामविकास अधिकारी के.डी.आहेर यांच्यासह ग्रामपंचायत सदस्य, विकास सोसायटीचे संचालक,ग्रामस्थ व नागरिक मोठ्या संख्येने ग्रामसभेला उपस्थित होते.

लोणी बुद्रुक येथील गुढी पाडव्याच्या ग्रामसभेप्रसंगी ना.विखे पाटील यांचा सत्कार करताना अण्णासाहेब म्हस्के पाटील, समवेत शालिनीताई विखे पाटील व ग्रामस्थ.

नाद करायचा नाही- विखे

- लोणी आणि प्रवरेचा कुणी नाद करायचा नाही. ज्यांनी ज्यांनी आतापर्यंत नाद करायचा प्रयत्न केला त्यांचे काय झाले हे संगळ्यानी बघितले आहे, अशा शब्दात ना. विखे पाटील यांनी विरोधकांना इशारा दिला.

शिर्डी विमानतळावरुन...

विमानतळावर ९ वाजुन ३० मिनीटाने पोहचले.शिर्डी विमानतळावरुन ९ वाजुन ५० मिनीटाने ७५ प्रवाशी घेऊन इंडीगोचे ६ ई ७०३९ हे विमान रात्री ११ वाजुन २५ मिनीटाने पोहचले.

गेल्या आठ वर्षांपासुन नाईट लँडीगची साईभक्तांना प्रतिक्षा होती. नाईट लँडीग सुरु झाल्यामुळे या विमानतळाच्या विकासात नविन पाऊल ठरणार आहे.अनेक वेळेस नाईट लँडीगची घोषणा झाली मात्र प्रत्यक्षात सुरुवात झालीच नव्हती. शिर्डी विमानतळ हे सुरु झाल्यापासुन प्रवाशांच्या सर्वाधिक पंसतीला उतरलेले विमानतळ आहे.सध्या या विमातळावरुन दिवसा ८ विमाने येतात तर ८ विमाने जातात अशा १६ फे-या या विमानतळावरुन सुरु आहे.महाराष्ट्र विमानतळ विकास प्राधिकरणाने नाईट लँडीगसाठी आवश्यक असलेले सर्व कामे पुर्ण करत केंद्राकडे परवानगी मागीतली होती. केंद्राच्या नागरी विमान वाहुतुक महासंचालनालयाने फेब्रवारी २३ मध्ये नाईट लँडीगला परवानगी दिली.त्यांनतर एप्रिल २३ मध्ये दिल्लीहून आलेल्या इंडीगो एअरलाइन्सचे रात्रीची पहिल्या विमानाची यशस्वी चाचणी झाली आणि या विमानतळाच्या विस्ताराचे आणि परिसराच्या प्रगतीचे एक नवे दालन खुले झाले होते. यशस्वी चाचणी नंतर दोन वर्षाने ही सेवा सुरु झाली आहे.

नाईट लँडिंग सुरु झाल्यानंतर काकडआरतीला उपस्थित राहू इच्छिणाऱ्यांना रात्री प्रवास करुन येता येणार आहे. एकूणच भाविकांना मोठ्या सुविधा यामुळे निर्माण होणार आहेत. रात्रीच्या विमानसेवेमुळे या परिसराच्या विकासाला सुद्धा गती प्राप्त होणार आहे. शिर्डीत भाविकांच्या संख्येत सुद्धा मोठी वाढ यामुळे अपेक्षित आहे.सुरुवात हैदराबाद विमानसेवेने झाली असली तरी भविष्यात इतर ठिकाणीही रात्रीची विमानसेवा सुरु होईल.

आता मातृभाषेत घेता येणार...

जाऊन डॉ. हेडगेवार आणि गोळवलकर गुरुजींना श्रद्धांजली अर्पण करण्याची संधी मिळाली. आपण संविधानाच्या ७५ वर्षाचा उत्सव साजरा केले आहे. पुढच्या महिन्यात बाबासाहेबांची जयंती आहे. मी दीक्षाभूमीवर बाबासाहेबांना नमन केले आहे. या विभूतींना नमन करताना देशवासियांना नवरात्री आणि सर्व पर्वांची शुभेच्छा देतो.

तसेच, लाल किल्ल्यावरून मी सर्व क्षेत्रातील प्रयत्नांबाबत माहिती दिली होती. पण आज आरोग्य क्षेत्रात जे काम होत आहे, त्याला माधव नेत्रालय वेगळ्या उंचीवर नेऊन ठेवत आहे. आपले जीवनात देशासाठी काम केलेल्या वृद्धांना आरोग्याची समस्या होऊ नये, याकरिता त्यांना चांगले उपचार देणे ही सरकारची निती आहे. आयुष्मान भारतच्या माध्यमातून लोकांना चांगले उपचार मिळत आहे. यावेळी देशात जवळपास एक हजार डायलिसीस सेंटर आहे, जिथे मोफत उपचार मिळत आहेत. यामुळे नागरिकांचे हजारो करोडो रुपये वाचत आहेत, अशी माहिती मोदींनी दिली.

तर, आम्ही केवळ वैद्यकीय महाविद्यालयांची संख्या दुप्पट केली नाही तर एम्स संस्थांची संख्याही वाढवली आहे. अधिकाधिक डॉक्टर उपलब्ध व्हावेत यासाठी वैद्यकीय जागांची संख्याही दुप्पट करण्यात आली आहे. देशातील गरीब मुलांना डॉक्टर बनता यावे यासाठी, आम्ही पहिल्यांदाच मातृभाषेत वैद्यकीय शिक्षण देण्यास सुरुवात करत आहोत. जेणेकरून ते भाषेच्या अडथळ्याशिवाय त्यांची स्वप्ने पूर्ण करू शकतील, अशी महत्त्वाची माहिती मोदींनी दिली. याशिवाय, गरिबांना स्वस्त दरात औषधे पुरवत आहोत. आयुष्मान भारत योजनेअंतर्गत कोट्यवधी लोकांना मोफत उपचार सुविधा मिळत आहेत. हजारो जनऔषधी केंद्रे देशातील गरीब आणि मध्यमवर्गीय कुटुंबांना परवडणाऱ्या दरात औषधे पुरवत आहेत. देशभरातील शेकडो डायलिसिस सेंटर मोफत डायलिसिस सेवा देऊन हजारो कोटी रुपयांची बचत करत आहेत. गेल्या १० वर्षांत, गावांमध्ये लाखो आयुष्मान आरोग्य मंदिरे बांधण्यात आली आहेत, जिथे देशातील सर्वोत्तम डॉक्टरांकडून टेलिमेडिसिनद्वारे सल्लामसलत, प्रथमोपचार आणि पुढील वैद्यकीय मदत दिली जात आहे, असेही नरेंद्र मोदी म्हणाले.

कर्जमाफी द्या अन्यथा गावबंदी

कर्जमाफीवरुन राज्यातील वातावरण तापण्याची शक्यता आहे. मनोज जरांगे यांनीदेखील शेतकरी कर्जमाफीवरुन इशारा दिला आहे. कर्जमाफी देणार नसाल तर यांना गावबंदी मोहिम हाती घेणार, असा गंभीर इशारा मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी राज्य सरकारला दिला आहे. शेतकऱ्यांनी कर्जमाफी करण्याची मागणी केली असली तरी परिस्थिती बघून निर्णय घेऊ, असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अर्थमंत्री अजित पवार यांनी स्पष्ट केलं आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी इथून पुढे स्वहित पाहावं, असं मनोज जरांगे म्हणाले आहेत.

सरकारी बांधकामाचे सर्वाधिकार...

ती खाती आपल्या मर्जीनुसार, आपल्या खात्यातील इमारत बांधणीची कामे करत होती. त्यासाठी त्यांनी खास अंतर्गत विभागच स्थापन केला होता. मात्र त्यांच्याकडे याबाबतच्या तज्ज्ञांची वानवा होती. तसेच तांत्रिक माहिती नव्हती. ही सर्व बाब मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या लक्षात आणून देण्यात आली. त्यांनी तत्काळ या प्रकरणात लक्ष घातले असून सर्व खात्यातील स्वतंत्र बांधकाम विभाग टप्प्याटप्प्याने बंद करण्यास सांगितले आहे. कोणत्याही खात्याला बांधकाम करायचे असल्यास त्यांना सार्वजनिक बांधकाम खात्याशी (पीडब्ल्यूडी) संपर्क साधणे आवश्यक आहे, असे सा. बां. खात्याने काढलेल्या आदेशात म्हटले आहे.

साईभक्तांना पाच लाखांचे विमा कवच

अधिकृत वेबसाईटवर आपली नोंदणी करणे बंधनकारक आहे. घरातून निघाल्यानंतर साई मंदिरात दर्शन करेपर्यंत काही अप्रिय घटना घडली तर पाच लाखांपर्यंतचे विमा संरक्षण भाविकाला किंवा त्याच्या कुटुंबियांना मिळणार आहे. जो साई भक्त बाबांच्या दर्शनासाठी येणार त्याच्यासाठी पाच लाखांचा विमा उतरवण्याचा निर्णय आम्ही घेतला आहे. त्यात प्रामुख्याने अट अशी आहे, जो भक्त साईबाबांच्या दर्शनासाठी येईल, त्यांनी दर्शनाला निघण्यापूर्वी साईबाबा संस्थानची ऑनलाईन वेबसाईटवर नोंदणी करणे आवश्यक आहे. यामुळे भक्त साईबाबांच्या दर्शनासाठीच येत आहे याची ओळख पटण्यास मदत होईल. जे भाविक फक्त नोंदणी करून येतील, त्यांचाच विमा उतरवला जाणार आहे. त्यामुळे सर्व साई भक्तांनी निघण्यापूर्वी साईबाबा संस्थानच्या ऑनलाईन वेबसाईटवर नोंदणी करावी असे आवाहन श्री. गाडीलकर यांनी केले.

रामगिरी महाराज हिंदू धर्मयोध्दा-शिंदे

धर्माचे कार्य करीत असून ते खरोखर धर्मयोद्धा असल्याचे प्रतिपादन उपमुख्यमंत्री एकनाथची शिंदे यांनी केले.

यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, देहू संस्थानचे पुरूषोत्तम मोरे, तुकाराम महाराज पालखी प्रमुख माणिक महाराज मोरे, वारकरी आघाडीचे अक्षय भोसले, संभाजी महाराज समाधी ट्रस्टचे सोपान महाराज, गोरक्षक दलाचे मिलिंद एकबोटे, आ. माऊली बाबा कटके, माजी खासदार शिवाजी आढळराव पाटील, सरला बेटाचे विश्वस्त मधुकर महाराज, यांच्यासह राज्यातील अनेक मान्यवर राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक क्षेत्रातील मान्यवरांसह शिवभक्तांची मोठी उपस्थिती होती.

गो मातेला राज्य मातेचा दर्जा दिला. पण अजुनही गोहत्या थांबलेली नाही, अशी मंहत रामगिरी महाराज खंत व्यक्त केली. ते म्हणाले, ठिक ठिकाणी गोमांस विक्री होते. गोरक्ष तरूण मुले ते पकडून गोमांस विक्री करणारांना पोलिसांच्या ताब्यात देतात. परंतु पोलीस प्रशासनाकडून गोरक्षकांना सपोर्ट मिळत नाही. उलट या तरुण गोरक्षकांना दोषी केले जाते. हे कुठे तरी थांबले पाहिजे, असे मत महंत श्री रामगिरी महाराज व्यक्त केले.

दीड हजार लाडक्या बहिणींच्या...

जिल्ह्यात या योजनेत १२ लाखांहून अधिक महिला पात्र करण्यात आल्या होत्या. सुरुवातीचे तीन महिने या योजनेत महिलांना आर्थिक लाभ देण्यात आली. मात्र, विधानसभा निवडणुकीनंतर राज्य पातळीवरून लाडक्या बहिणी योजनेत पात्र असणाऱ्या महिलांची तपासणी सुरू करण्यात आली आहे. यासाठी सरकार पातळीवरून पहिल्या टप्प्यात परिवहन विभागाकडे नोंदणी असणाऱ्या चार चाकी वाहन नावावर असणाऱ्या महिलांची माहिती घेण्यात येत आहे. सरकार पातळीवरून मार्च महिन्यांच्या पहिल्या आठवड्यात नगर जिल्ह्यातील २० ते २२ हजार महिलांची यादी महिला बालकल्याण विभागाकडे पडताळीसाठी पाठवण्यात आली होती. या यादीनूसार पहिल्या टप्प्यात नगर जिल्ह्यातील दीड हजार महिलांच्या नावे चारचाकी वाहन असून त्यांची माहिती आता सरकारला पाठवण्यात येणार आहे. सरकार पातळीवरून या महिलांना लाडकी बहिण योजनेचा लाभ सुरू ठेवायचा की बंद करावयाचा याबाबत निर्णय घेण्यात येणार आहे. चारचाकी वाहन असणाऱ्या महिलांच्या नावाच्या यादीबाबत योजनेचे नोडल अधिकारी तथा जिल्हा महिला बालकल्याण अधिकारी नारायण कराळे यांच्याकडे विचारणा केल असता राज्य पातळीवरून चारचाकी वाहन नावावर असणाऱ्या महिलांची यादी ही परिवतन खात्याकडे तपासणीसाठी पाठवण्यात आले सांगण्यात आले.